वनवृत्तांकरीता सुधारीत पालक अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांची नियुक्ती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक- आयएफएस-२०१७/प्र.क्र.१०८/फ-७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक- २ ऑगस्ट, २०१९

<u>**संदर्भ**</u> :- १. महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक आयएफएस- २०१२ /१३५ / प्र.क्र.३४ /फ-७ दिनांक १४ जुलै २०१५,
२. महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक आयएफएस- २०१७/प्र.क्र.१०८/फ-७अ, दिनांक १८ फेब्रुवारी २०१९,
३. महसूल व वन विभाग, शासन आदेश क्रमांक एएफओ-२०१९/प्र.क्र.०४/फ-७, दिनांक २८ मे २०१९,
४. महसूल व वन विभाग, शासन आदेश क्रमांक एएफओ-२०१९/प्र.क्र.०४/फ-७, दिनांक १७ जुलै २०१९.

परिपत्रक :-

राज्यातील वन विभागांतर्गत सद्यस्थितीत असलेल्या ११ प्रादेशिक वनवृत्तांच्या प्रशासनावर संनियंत्रण ठेवणे व प्रशासनात गतीमानता आणणे याकरिता प्रत्येक प्रादेशिक वनवृत्तासाठी स्वतंत्र पालक अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक नियुक्त करण्याबाबत व त्यांनी करावयाच्या प्रशासकीय कामकाजाबाबत संदर्भाधिन दिनांक १४ जुलै, २०१५ च्या परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच संदर्भाधिन दिनांक १८ फेब्रुवारी २०१९ च्या परिपत्रकान्वये प्रादेशिक वनवृत्तनिहाय पालक अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांच्या नियुक्तीबाबत फेरबदल करण्यात आले आहेत.

२. संदर्भाधिन दिनांक २८ मे २०१९ आणि दिनांक १७ जुलै २०१९ च्या शासन आदेशान्वये भावसे संवर्गातील अधिका-यांची पदोन्नतीने पदस्थापना करण्यात आली असल्याने संदर्भ क्रमांक २ येथील दिनांक १८ फेब्रुवारी २०१९ च्या शासन परिपत्रकातील खालील नमूद प्रादेशिक वनवृत्त पालक अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांच्या नियुक्तीबाबत बदल करण्यात येत आहे.

अ.क्र.	वनवृत्त	सध्याचे पालक अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक	नविन पालक प्रधान मुख्य वनसंरक्षक /अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (नाव व पदनाम)
१	अमरावती	डॉ. पी. श्रीवास्तव, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व प्रसिध्दी)	श्री. एम.के.राव, प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती तंत्रज्ञान व प्रसिध्दी)
२	औरंगाबाद	श्री. विकास गुप्ता,अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा)	श्री. विकास गुप्ता,अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन- दुय्यम संवर्ग) नागपूर.

३	यवतमाळ	श्री. ए. आर. मंडे,अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन दुय्यम संवर्ग)	श्री.संजीव गौड, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (महा-कॅम्पा) (अतिरिक्त कार्यभार)
४	नागपूर	श्री. बी. एस. हुडा,अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण)	श्री.एन.मोहन कर्नाट, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण) नागपूर. ***(केंद्रीय प्रतिनियुक्तीवरुन राज्य सेवेत प्रत्यावर्तित झाल्यानंतर)***

३. सर्व पालक प्रधान मुख्य वनसंरक्षक/अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक हे त्यांच्याशी संबंधीत वनवृत्ताकरिता संदर्भाधीन क्रमांक १ येथील महसूल व वन विभाग,शासन परिपत्रक क्रमांक आयएफएस-२०१२/१३५/प्र.क्र.३४/फ-७ दिनांक १४ जुलै २०१५ च्या शासन परिपत्रकातील परिच्छेद क्रमांक २ ब येथे नमूद केलेले कामकाज पार पाडतील.

४. सदरचे परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून संबंधित पालक प्रधान मुख्य वनसंरक्षक /अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या वनवृत्तातील अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदित/ पुनर्विलोकीत करण्याचे काम पार पाडतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०८०२१२४३४२४३१९ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानूसार व नावाने.

VIRENDRA RAMBAHAL TIWARI

Digitally signed by VIRENDRA RAMBAHAL TIWARI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, postalCode=400032, street=R AND F D,4TH FLOOR,MANTRALAYA,MUMBAI, ou=FOREST DEPARTMENT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VIRENDRA RAMBAHAL TIWARI
Date: 2019.08.03 11:25:54 +05'30'

(वीरेंद्र तिवारी)

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत:-

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. विरोधी पक्षनेता,विधान परिषद/विधान सभा, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई,
७. सर्व सन्माननीय विधान परिषद/विधान सभा सदस्य, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई,
८. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
९. प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर,
११. व्यवस्थापकीय संचालक, वन विकास महामंडळ, नागपूर,
१२. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे,

१३.प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर,
१४.प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर,
१५.प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), महाराष्ट्र राज्य, नागपूर,
१६.सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
१७.सर्व मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक/उप वनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी व सहायक वनसरंक्षक पदावर कार्यरत असलेले भारतीय वन सेवेतील अधिकारी,
१८. सर्व महाव्यवस्थापक/विभागीय व्यवस्थापक, वनविकास महामंडळ मर्या,
१९. प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक,
२०. सहसचिव/उपसचिव/विशेष कार्य अधिकारी (फ-१), महसूल व वन विभाग (वने कक्षातील),
२१. निवडनस्ती, कार्यासन फ-७अ.